# भाषेचे शाळेमधील चेताविषयक कार्य

शालेय स्तरावर भाषा शिक्षण ही अत्यंत गुंतागुंतीची पण व्यावहारिक गोष्ट असते. मुले जेवढे स्वतःचे ‘ भाषाशिक्षण’ क्रमिक पुस्तके अभ्यासून करतात, त्यापेक्षा कितीतरी अधिक ते शाळेतील त्यांच्या दैनंदिन व्यवहारांतून करीत असतात. मुले वर्गात असोत, मैदानावर खेळत असोत, मनाशीच विचार करीत असोत अथवा शिक्षकांना प्रश्नांची उत्तरे देत असोत किंवा कुणाला काही सांगत असोत, मुले सदैव भाषेच्या वापरात गुंतलेली असतात. मुलांचे भाषाशिक्षण हे असे दिवसभर चालूच असते.

मेल लेवाईन हे बालरोग विषयाचे प्राध्यापक तसेच पालक, शिक्षक वगैरेंना शिक्षण या विषयावर सहशिक्षण देत असतात. त्यांचा २००२ साली प्रकाशित झालेला “अ माईंड अॅट अ टाईम” हा ग्रंथ शिक्षणप्रक्रियेत आपल्याला खोलवर घेऊन जाणारा आहे.

आपण शिकतो तेव्हा आपला मेंदू शिकत असतो. मेंदूमध्ये शिकण्याची वेगवेगळी कार्ये करणारी यंत्रणा उपलब्ध असते. मेल लेवाईन यांनी त्याला ‘चेताविकासक कार्ये” (neurodevelopmental functions) असे म्हटले आहे. मेंदूमध्ये अब्जावधी पेशी असतात; या चेतापेशींच्या हजारो इतर पेशींशी जोडण्या होत असतात. जितक्या जोडण्या तितकी संपर्कस्थाने, विदर(synases) निर्माण होतात. पेशी-पेशींमधील संदेशवहनासाठी अशा संपर्कस्थानांची गरज असते. या संपर्कस्थानांकरवी, पेशींच्या जोडण्यांतून असंख्य पेशीजालिका (networks) तयार होत जातात, चक्क विषयवार त्यांच्या स्वतंत्र व्यवस्थाही निर्माण होतात. मुले वाढतात, शिकत जातात, शिकता शिकता वाढत जातात, प्रगती होत जाते, तसतशा या व्यवस्था, त्यांच्या वापरांतूनच बळकट होत जातात. लेवाईन यांनी अशा, शालेय मुलांच्या शिकण्याशी संबंधित असलेल्या आठ व्यवस्थांचा उल्लेख व त्यांचे सविस्तर विवेचन, आपल्या ग्रंथात केले आहे. या आठ व्यवस्थांच्या विकासाला संधी देणे, वाव देणे यावर पालक-शिक्षकांनी लक्ष पुरवले पाहिजे, असे लेवाईल यांचे सांगणे आहे

या मेंदूस्तरावरील आठ चेताविकासक व्यवस्थांपैकी एक व्यवस्था आहे ती ‘भाषाचेताविकासक व्यवस्था ’ होय. प्रामुख्याने लहान मुलांच्या संदर्भातील काही मूलभूत कार्ये या व्यवस्थेकडे असतात. उदाहरणार्थ, प्रत्येक भाषेत उच्चारांचे अनेक स्वर – स्वनिम असतात. यांमधील फरक ओळखून त्यांचा वापर करणे ही एक मूलभूत गोष्ट असते; शाळेतील वाचन-व्यवहाराशी हिचा घनिष्ठ संबंध असतो. त्यामुळे ही गोष्ट सहजतेने होणे, हा मुलांच्या शिकण्यातील सुरूवातीच्या भाषाविकासाचा अनिवार्य असा भाग असतो. तसेच, शालेयपूर्व आणि

शालेय वयांत नव्या नव्या शब्दांचे आकलन होऊन, मुलांचा शब्दसंग्रह वाढत जाणे, ही या वयांतील भाषा विकासाची दुसरी मूलभूत गोष्ट असते. वाढता शब्दसंग्रह ही भाषावृध्दीतील आणि भाषाभिवृध्दीतील एक अविभाज्य गोष्ट असते. हिचा संबंध आपले विचार बोलून वा लिहून व्यक्त करण्याशी असतो. त्यासाठी शब्द अर्थासहित समजणे, तो लक्षात राहणे आणि त्याचा वापर करता येणे, या क्षमता वृध्दिंगत होणे आवश्यक असते. अशीच तिसरी एक मूलभूत गोष्ट आहे ती म्हणजे, भाषा- शब्द- वाक्ये आकलनाचा होय. याचा संबंध दुसऱ्यांचे वेगाने होत जाणारे बोलणे ऐकण्याशी असतो. भाषण ऐकताना, वक्त्याच्या बोलण्याच्या वेगाशी आपला ऐकण्याचा आणि ऐकत असलेल्या बाबींच्या आकलनाचा वेग जुळावा लागतो. दैनंदिन व्यवहारांतही, दुसऱ्यांचे बोलणे ऐकून समजावे लागते. मुले जेव्हा दुसरी भाषा शिकतात, तेव्हासुद्धा त्यात येणाऱ्या 'नव्या' शब्दांचे अर्थ' अगोदरच माहीत असतील तर, म्हणजे मूळ भाषेतील शब्दसंग्रह मोठा असेल तर, आणि आकलनाचा वेग चांगला असेल तर, दुसरी भाषा शिकणे सुलभ होते, सहज होते.

**शाळेचे काम काय असते?**

शाळेत एक समाजगट असतो. विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक-शिक्षिका, यांचा हा एक दैनंदिन मेळा असतो. त्यांचा सतत परस्परांशी संवाद, प्रतिसंवाद चालत असतो, आणि तो भाषेकरवी होत असतो. जरा बारकाईने न्याहाळले तर त्यात एक भाषिक क्रिया घडून येत असते. शब्द आणि विचार यांच्यात परस्पर विनिमय सतत चालत असतो, त्याचा एक प्रवाह वाहत असतो. शाळेच्या वर्गांतून आणि प्रांगणात तो हवेसारखा भरून असतो. भाषेची गिचमिडच दिवसभर चालू असलेली दिसते. दिवसभरच्या या भाषिक गिचमिडीचे थोडे विश्लेषण करता येईल. त्यासाठी आत डोकावून पाहायला हवे.

भाषा भोवती पांघरूनच मुले शाळेत वावरत असतात. तो शब्द आणि विचार यांचा सततचा पाठशिवणीचा खेळ चालूच असतो. पण एवढेच नसते. इथे भाषा हे संवादाचे माध्यम असते. मित्र-मैत्रिणी, शिक्षकवृंद यांच्यात अखंड परस्पर संवाद घडत असतो. मुले मुलांशी – आपल्या बरोबरीच्या, आपल्यापेक्षा मोठ्या, आपल्यापेक्षा लहान, ओळखीच्या, अनोळखी मुलांशी, शिक्षकांशी, अगदी थेट प्राणी आणि वनस्पतींशी संवाद करीत असतात. पालकही यात कधीमधी भाग घेतात. या सततच्या संवाद-प्रक्रियांकडे, मुलांच्या शिकण्याच्या अंगाने विचार केलात तर लक्षात येईल की, याचा सरळ संबंध मुलांच्या वाचन, लेखन, गणन, व्याकरण, भाषण-संभाषण अशा साक्षरी (academic) कौशल्यांशी असतो. मुलांच्या 'अभ्यासा'शी असतो.

मुलांच्या मेंदूचा अंतरंगात डोकावले तर, एक वेगळी चेताविकासक व्यवस्था आढळून येईल. ही आहे, स्मृतीची चेताविकासक व्यवस्था. भाषा चेताविकासक व्यवस्था ही या व्यवस्थेची भगिनी आहे. मुले जेव्हा आपल्या कल्पना, आपले विचार शब्दांकित करायला लागतात, तेव्हा ते स्मृतींत साठायला मदत होते. आणखी

एक संबंध असा की, भाषा हा संकल्पनाबांधणीचा कच्चा माल असतो, आणि संकल्पनांचे विश्व हेच तर मुलांच्या शालेय अभ्यासाचे प्राण असतात. भाषेकरवी संकल्पनांचे आकलन होते आणि भाषेकरवीच त्यांची स्मृतीत साठवण होते. भाषेचे आणखी एक शैक्षणिक कार्य असते; ते म्हणजे, मुलांच्या बाबतींत, स्वतःच्या भावनांचे नियमन करण्याचे आणि नियंत्रण करण्याचे. समवयस्कांशी बोलण्याने, बोचऱ्या भावनांचे विरेचन होते. मुले भावनाविवशतेपासून आणि भावनातिरेकापासून मुक्ती मिळवितात. मुलांचे वर्तन संतुलित राहायला सहाय्य होते. मुले परस्परांतील संबंध उबदार ठेवण्यासाठी संतुलित, सहाय्यक, सौम्य भाषा वापरायला शिकतात.

शालेय पातळीवर भाषेला आणखी एक फार महत्त्वाचे कार्य पार पाडायचे असते. ते म्हणजे, अन्य सर्वच विषय शिकण्याचे. भाषा हेच गणित, इतिहास, भूगोल, विज्ञान आणि अगदी चित्रकला, खेळ आणि नृत्य, नाट्य यांचे आकलन माध्यम असते. सर्वसामान्य भाषा, उच्च प्रतीची भाषा, वेगवेगळया विषयांची तांत्रिक भाषा ही सारी भाषिक उपमाध्यमे वापरल्याशिवाय शिकताच येत नाही. भाषा हे केवळ संवाद माध्यम, शिक्षकांकडून शिकण्याचे माध्यम नसते, तर ते व्यक्ती-व्यक्तींमधील संबंध बांधणीचे माध्यम असते. वर्गामध्ये भाषा हे ज्ञानपूरक संकल्पबांधणीचे माध्यम असते तर मैदानावर ते कालातीत स्नेह बांधणीचे माध्यम असते.

वर्गातील भाषाशिक्षणाबरोबरच, शाळेतील, पण वर्गाबाहेरील आणि क्रमिक पुस्तकाबाहेरील भाषा शिक्षणाच्या संधी, वाया जाता कामा नयेत; त्यांचे शालेय विषय अभ्यासाच्या वेळापत्रकाप्रमाणेच, अगदी दैनंदिन ते वार्षिक वेळापत्रक तयार करण्याचा प्रयत्न करता येईल. वयोमानानुसार, इयत्तांनुसार चढत्या प्रमाणात भाषा समृद्धीचा आलेख मांडता येईल. मुलांना शालेय वातावरणातच, निदान एक तरी भाषा नीट आली पाहिजे. मुलांची पहिली, परिसर भाषा समृद्ध होणे, हे एक शालेय शिक्षणाचे सर्वसामान्य उद्दिष्ट म्हणून स्वीकारले पाहिजे. भाषा शिक्षणासाठी ‘सकलशाळा दृष्टिकोण’ (Whole School Approach) समोर ठेवून, भाषा समृद्धीचा जिना मुलांना चढता आला पाहिजे. परीक्षेसाठी नव्हे, तर जीवनासाठी भाषा आणि क्रमिक पुस्तकातून नव्हे, तर जीवनातून भाषा, हेच भाषा शिक्षणाचे व्यावहारिक उद्दिष्ट होय !

❖